# अटके संबधी नागरीकांचे / पोलीसांचे अधिकार व कर्तव्य संबधीच्या कायदेशीर तरतुदी

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# प्रस्तावणा

- भारतीय राज्यघटनेत भारत देशात राहणा-या जनतेस / समाजातील प्रत्येक व्यक्तीला (भारतीय नागरीकांना) व्यक्तीस्वातंत्र देण्यात आले आहे. त्याच बरोबर समाजात कायदा व सुव्यवस्था कायम राहुन शांतता राहण्यासाठी काही नियम सुध्दा घालुन दिले आहे. अशा नियमांचे उल्लंघण करणा-यांना योग्य प्रकारचे शासन होणे करीता विविध प्रकारच्या कायद्यांची निर्मीती करण्यात आली आहे. अशा समाजातील समाजकंटकांना / गुन्हेगारांना त्याच्या गुन्हेगारी कृत्यापासुन प्रतिबंधीत करणेसाठी त्यांचे स्वातंत्रावर बधन आणले जाते त्यालाच कायद्यात अटक असे संबोधण्यात आले आहे.

फौजदारी दंड प्रक्रिया संहीता, भारतीय राज्यघटना, कारागृह मार्गदर्शीका, महाराष्ट्र पोलीस मार्गदर्शीक व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय मधील तरतुदींचा विचर करताा असे निदर्शनास येते की, अटक होताचा नागरीकांना विविध प्रकारचे अधिकार प्राप्त होतात. त्या अधिकारांचा वापर करणे हा निश्चितच त्यांचा अधिकार आहे.

त्याचबरोबर पोलीसांनाही अटकेबाबत अधिकार व कर्तव्यासंबधी नियम घालुन दिले आहेत. या प्रकारणात आपण नागरीक व पोलीसांचे अधिकार तसेच कर्तव्य अभ्यासणार आहोत.

# अटकेनंतर नागरीकांचे अधिकार

१) फौ.दं.प्र.सं. कलम ५०(१) अन्व्ये अटक होताच कोणत्या गुन्हयाकरता त्याला अटक केली आहे याचा खुलासा / माहीती संबधीत अटक झालेल्या व्यक्तीला दिली पाहीजे.

२) फौ.दं.प्र.सं.कलम ५०(२) अन्वये अपराध जामीनपात्र असेल तर अटक व्यक्तीला पोलीसांनी त्याला जामीनावर सुटण्याचा हक्क समजावुन सांगुन त्यास जामीनदाराची व्यवस्था करणेस सांगीतले पाहीजे.

३) अटक व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकांना / हितचिंतकाना त्याचे अटकेची माहीती पोलीसांनी तात्काळ दिली पाहिजे.

४) फौ.दं.प्र.सं. कलम ५७ प्रमाणे अटक व्यक्तीला त्याला अटक केलेल्या वेळेपासुन २४ तासांपेक्षा जास्त काळ पोलीस कस्टडीत ठेवता येणार नाही.

# अटकेनंतर नागरीकांचे अधिकार

५) भारतीय राज्यघटना कलम १२(१) अन्वये त्याला आपल्या वकीलांशी संपर्क साधता येईल.

६) फौ.दं.प्र.सं.कलम १६०(१) मधील अपवाद वगळुन १५ वर्षाखालील लहान मुले व ६५ वर्षा वरील वृध्द तसेच कोणत्याही वयाच्या स्त्रीला पोलीस स्टेशनमध्ये पुढील चौकशी अथवा अटकेसाठी बोलविता येणार नाही.

७) अटक आरोपीस प्रश्नांची उत्तरे देण्यास सक्ती, दमदाटी करता येणार नाही. तसेच प्रलोभन, वचन यांचा वापर करता येणार नाही. परंतु फौ. दं.प्र.सं कलम १६०(२) प्रमाणे त्याने सत्य कथन करावे अशी तरतुद आहे.

८) अटक आरोपीस प्रश्न विवचारल्यास त्याने मौन पाळण्याचा अधिकार आहे.

# अटकेनंतर नागरीकांचे अधिकार

९) शारीरिक अगर मानसिक दबाव, सक्ती, त्रास यास विरोध करण्याचा त्याला अधिकार आहे.

१०) जामीनपात्र गुन्हयात जामीन देताच पोलीसांनी अटक आरोपीस मुक्त केले पाहीजे.

११) पोलीसांना अटकेचे अधिकार आहेत. याची स्पष्ट कल्पना नागरिकास दिली पाहिजे. नाहीतर नागरिकास विरोध करता येईल, असे मतप्रदर्शन A.I.R. 1924 MAD 555 मध्ये केले आहे. तसेच आय.पी.सी कलम ९९(१) प्रमाणे ओळख दिली पाहिजे.

१२) बेकायदेशिर अटकेस नागरिक हरकत घेऊ शकतो आणि तो गुन्हा होत नाही.

# अटकेनंतर नागरीकांचे अधिकार

१३) फौ.दं.प्र.सं.कलम ५१ अन्वये अटक नागरीकाची अंगझडती घेतली जाते तेव्हा त्याचेपाशी असलेल्या सर्व वस्तुंची तपशिलवार पावती मिळण्याचा अधिकार आहे. तसेच अटक नागरीक महिला असेल तर सभ्यता काटेकोरपणे पाळुन झडती महिला अधिकारी कर्मचारी यांनीच घेतली पाहिजे.

१४) फौ.दं.प्र.सं. कलम ५४ अन्वये त्याची अटकेपुर्वी वैद्यकीय तपासणी केली पाहिजे किंवा स्वताला निर्दोष सिध्द करणेसाठी तशी वैद्यकीय तपासणी करण्याची मागणी करण्याचा अधिकार अटक नागरीकाला आहे. उदा. बरेच वेळा बलात्कार, मारामारी अशा प्रकरणात घेतलेल्या खोटा आरोपातुन स्वताला निर्दोष सिध्द करणेसाठी

# अटकेनंतर नागरीकांचे अधिकार

१५) फौ.दं.प्र.सं.कलम ५७ अन्वये अटक नागरीकाला अटकेपासुन २४ तासाचे आत (प्रवासाचा कालावधी वगळुन) जवळचे न्यायालयासमक्ष हजर केले पाहिजे. न्यायालयाचे आदेशाशिवाय त्याला २४ तासापेक्षा जास्त वेळ पोलीस स्थानबध्द करून ठेवु शकत नाही.

वरील नमुद सर्व अधिकारांपासुन त्याला वंचित ठेवणे हा अपराध आहे. कारण सर्वसाधारण नागरीक ज्या वेळी पोलीस स्टेशन मध्ये त्याला नेले जाते तेव्हा अटकेच्या या सत्राने तो घाबरून जातो. परंतु दुर्दैवाने नागरिकांना त्यांचे कायदेशिर हक्क आणि राज्य घटनेने दिलेले संरक्षण, स्वातंत्र यांची माहिती नसते. तसेच ज्या नागरीकांना त्यांचे अधिकार माहिती असतात ते अटकेच्या बेकायदेशिर प्रक्रियेविरूध्द न्यायालयात पोलीसांची तक्रार करतात त्यामुळे पोलीसांना कायदेशिर कारवाईला सामोरे जावुन पोलीस दलाची प्रतिमा मलीन होते.

# बेकायदेशिर अटकेच्या कार्यवाही बाबतच्या तरतुदी

- अटकेच्या प्रकरणात पोलीसांनी जर कसुर केली, तर त्यांचे विरूध्द खालील नमुद कायदा व कलमान्वये गुन्हा दाखल होवुन शिक्षा होवु शकते.

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....